Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# मराठी कथा लेखिकांच्या कथांतील स्त्री जाणिवा

**डॉ. देशमुख रमेश तुकोजीराव**
मराठी विभाग प्रमुख,
सिध्दार्थ कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, जाफ्राबाद जि. जालना

**पार्श्वभूमी :-**

जगातील कथा लेखनाचा अभ्यास करताना असे लकक्षात येते की सर्वप्रथम मानव एकदुसऱ्याला मौखिक कथा सांगत गेला. एक पिढीकडून आलेली कथा दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत गेली. ही परंपरा खऱ्या अर्थाने स्त्रियानी जतन करून ठेवली आहे. तरी देखील पुरूषी वर्चस्वाने स्त्रीयांना नाकारले. त्याविरुध्दात सर्वात प्रथम बंगाल व महाराष्ट्रात आवाज उठला. राज राममोहन रॉय ईश्वरचंद विद्यासागर या समाज सुधारकांनी बंगाली स्त्रियांनवर सतीप्रथेसारख्या होणाऱ्या अन्यायाला वाच फोडली. तर महाराष्ट्रात ज्योतिबा फुल्यांनी बोलणे, लेखन आणि प्रत्यक्ष कृतीद्वारे स्त्रियांसाठी भक्कमपणे काम करुन समाजक्रांतीच्य इतिहासात अग्रगण्य ठरले स्त्रीशिक्षणाची महत्त्वाची दिशा महात्मा फुल्यांनी दाखविल्यानंतर वि.रा. शिंदे, अण्णासाहेब कर्वे या समाज सुधारकांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी प्रयत्न केले. म. गांधीनी पुढे स्त्रियांना राष्ट्रलढ्याच्या प्रमुख प्रवाहात आणुन त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला. अनेक बंधनात जखडली गेलेली स्त्री माणूस, व्यक्ती म्हणून नगण्य ठरलेली होती तिच्या बुध्दीचा, मनाचा, कर्तृत्वाचा गुणांचा व योग्यतेचा विचारच पुरुषप्रधान कुटुंब व समाज व्यवस्थेत केला जात नव्हता हे चित्र बदलण्यासाठी माणूस म्हणून जगण्याची व प्रतिष्ठेने पुरुष-समाजात निर्भय होऊन वावरण्याची परिस्थीती तिला मानवाधिकार मिळवून देवून कशी निर्माण करता येईल यासाठी सुशिक्षित स्त्रिया पुढे सरसावल्या.

स्त्रियांच्या प्रगतीला खज्या अर्थाने स्वातंत्र्योत्तर कालखंडात म्हणजेच एकोणिसाव्या शतकातच प्रारंभ झाला. औद्योगिक क्रांती बरोबरच साहित्य कला लेखन ज्ञान विज्ञान यात देखील क्रांती झाली व प्रगतीला वेग आला. स्त्री शिक्षणाला होत असलेला विरोध संपून स्त्रीया स्वतंत्रपणे आपले विचार व्यक्त करू लागल्या. शिक्षण, साहित्य, कला, समाजकारण आणि राजकारणातही स्त्रियांनी कार्य करण्यास सुरवात करुन स्वतःची क्षमता सिध्द केली. आता स्त्रीयाना व्यक्तीस्वतंत्र मिळण्यास सुरूवात झाली होती. सुरवातीच्या काळात नोकरीसाठी घराबाहेर पडणारी स्त्री आज लष्कराची मानवंदना स्वीकारत आहे 'करियर' ही बाब केवळ पुरुषांची नाही, स्त्री ही करियर करु शकते स्त्रीमध्येही ती क्षमता आहे याविषयी जाणीव स्त्रियांना आणि समाजालाही होऊ लागली. मुलीनाही समान संधी देण्याची पालकांची वृत्ती निर्माण झाली.

स्त्रियांमध्ये होणारी जागृती केवळ शहरी, पांढरपेशा समाजापुरता मर्यादित नव्हती. तर समाजाच्या सर्वच स्तरातील स्त्रियांना काळाचे भान येत होतो स्त्री-पुरुषसमानता मानल्याने स्त्रियांचे दुय्यम स्थान नष्ट झाले. स्त्रियांना सर्व क्षेत्रात समान संधी मिळू लागली. स्त्रियांच्या संदर्भातील अन्यायी कायदे रद्द होऊन स्त्रियांच्या नैसर्गिक हक्कांचे नवे कायदे निर्माण झाले २० व्या शतकात स्त्रियांच्या प्रगतीला खज्या अर्थाने अधिक चालना मिळालेली आहे. १९०४ मध्ये मुंबईत स्त्रियांची पहिली अखिल भारतीय परिषद भरली. या परिषदेने स्त्रियांना संघटित होऊन काम करण्याची, सार्वजनिक कार्य करण्याची प्रेरणा दिली. स्त्रियांचे प्रश्न सोडविण्यास स्त्रियांनीच एकत्र आले पाहिजे. ही महत्त्वाची

जाणीव स्त्रियांमध्ये निर्माण झाली. १९१६ मध्ये महर्षी अण्णासाहेब कर्वे यांनी पहिल्या महिला विद्यापीठाची स्थापना केली. महिला विद्यापीठामुळे स्त्रीशिक्षणात वाढ झाली.

स्त्रियांमध्ये होणारी जागृती ही शहरी, पांढरपेशा समाजापुरती मर्यादित नव्हती तर सर्व जाती जमातीतील स्त्रियांना काळाचे भान येत वैचारिक जागृती येत होती. १९४२ मध्ये 'शेड्युल कास्ट फेडरेशन महिला परिषद' स्थापन झाली. या परिषदेचे अधिवेशन नागपूर येथे स संपन्न झाले होते त्यात महिलांचा खूप मोठा सहभाग होता. तो सहभाग ' पाहुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "स्त्रियांमध्ये जागृती नि झाली तर त्या अस्पृश्य समाजाची फार मोठी प्रगती घडवून आणु शकतात, यांची मला जाणीव आहे. महिलांची संघटित संस्था असावी. यावर माझा विश्वास आहे. माझ्या अनुभवावरून मी हे सांगतो आहे दलित समाजाचे कार्य मी हाती घेतले तेव्हाच मी निर्धार केला होता की, पुरुषांच्या बरोबरीने स्त्रीलाही पुढे नेले पाहिजे. स्त्रीसमाजाने किती प्रमाणात प्रगती केली यावरुन मी दलित समाजाच्या प्रगतीचे मोजमाप करतो."

महाड येथील चवदार तळ्याचा सत्याग्रह, नाशिक येथील काळराम मंदिरप्रवेश सत्याग्रह या आंदोलनात दलित स्त्रियांनी मोठ्याप्रमाणात सहभाग घेतला होता. तसेच हैद्राबाद मुक्ती आंदोलन, संयुक्त महाराष्ट्र आंदोलन, गोवामुक्ती आंदोलन आणि महागाई विरुध्द चळवळीत स्त्रियांनी अडचणी, विरोधाला न घाबरता अनेक चळवळीमध्ये सहभाग घेतलेला आहे. असे असले तरी स्त्री शिक्षण अजून समाजाच्या पचनी पडलेले दिसत नाही. स्त्रियांचे जग फक्त घर व कुटुंब एवढेच मर्यादित नसुन तिला समाजात महत्त्वाचे स्थान असणे गरजेचे आहे राज्यघटनेने स्त्री-पुरुष समानता दिली असली तरी दैनंदिन वास्तव जीवनात ती समानता आजुनही प्रभावीपणे प्रत्यक्षात उतरतांना दिसत नाही. त्यामुळे स्त्री मन जागृतीची, समाज जागृतीची गरज आहे. विचारांच्या मांडणीवबरोबर काही धडक कार्यक्रम, उपक्रमाची गरज होती. स्त्री मुक्ती व स्त्री पुरुष समतेच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी ज्योती म्हापसेकरांनी 'मुलगी झाली हो' हे नाटक लिहिले या नाटकाचे बरेच प्रयोग झाले. या नाटकाने जनजागृतीचे काम करुन इतिहास घडविला.

**नियतकालिकांचे कार्य :-**

स्त्री जीवन आणि नियतकालिके यांच्यात एकोणिसाव्या शतकापासुन जिव्हाळ्याचा अनुबंध निर्माण झाला. १८८९ मध्ये माणिकबाई लाड यांनी 'आर्यभगिनी' नावाचे नियतकालिक सुरू केले. स्त्रियांना स्त्रीशिक्षण, विधवाविवाह इ. सामाजिक प्रश्नांच्या संदर्भात जागृत करुन स्त्री लेखनाला प्रवृत्त करण्याचे काम नियतकालिकांनी केले 'ग्रहलक्ष्मी' नवी ग्रहलक्ष्मी 'महिला' 'भगिनी' 'निताविश्व' 'स्त्री' या नियतकालिकांनी स्त्रियांच्या ज्ञानकक्षा विस्तृत केल्या. सौदामिनी राव यांनी 'बायजा' हे द्वैमासिक सुरु करून स्त्री वादी नियतकालिकांचा प्रवाह नव्या रूपात सुरू ठेवला. 'प्रेरक ललकारी' 'महिला आंदोलन पत्रिका" स्त्री उवाच ' 'मिळवुन साज्याजणी' या मराठी नियतकालिकाबरोबर 'मानुषी' 'हिंदी व इंग्रजी' नारी मुक्ती 'गुजराथी सबला' हिंदी 'समता' कन्नड 'मानवी' मल्याळम 'संघर्ष' इंग्रजी 'सचेतना' 'सबल' बंगाली ही सर्व नियतकालिके स्त्रियांनी संपादित केली. या नियतकालिकांनी स्त्रियांनवरील अन्यायाविरुध्द आवाज उठवून स्त्रियांच्या प्रश्नावर समाजाचे प्रबोधन केले. चहाच्या मळ्यातील स्त्री मजुरापासुन ते भटक्या विमुक्त स्त्रियांच्या प्रश्नापर्यंत सर्व विषयांना हाताळण्याचा प्रयत्न करुन स्त्रीविषयक विचारांचे क्षेत्र विस्तृत केले.

**वाङमयीन परिणाम :-**

नियतकालिकांच्या माध्यमातून जागृत झालेल्या स्त्रीमनामध्ये कल्लोळ उठला, प्रकाशाची वाट दिसल्यामुळे आनंद वाढला होता. स्त्रियांचा आत्मभान वाढला होता. त्या आत्मभानातुनच स्त्री मनातील नवसंवेदनांची बिंबे प्रतिबिंबे ललित साहित्यातुन उमटण्यास सुरवात झाली. नवजाणिवेचा उद्गार प्रथम कवितेत उमटला आणि तो

आत्मचरित्रापर्यंत पोचला प्रज्ञा लोखंडे, अनुराधा पाटील, आसावरी काकडे या कवयित्रीच्या कवितेतून स्त्रियांची भावनिकता व्यक्त होते. तर कथात्म साहित्यातुन कमल देसाई, गौरी देशपांडे, सानिया प्रिया तेंडुलकर, आशा वेगवेगळ्या लेखिकांनी कथात्म साहित्यातुन स्त्रियांच्या बदलत्या व्यक्तिमत्वाबरोबर स्त्रीमनाचा वेध सातत्याने घेण्याचा प्रयत्न केला आहे. छाया दातार, 'स्त्री-पुरुष' 'पुरूष केंद्र" स्त्रीविमुक्ती; 'स्त्रीमुक्ती चळवळ' पुरुषप्रधान संस्कृती चंपा लिमये 'अबला होई प्रबला', 'स्वतःला शोधताना' 'मी बाई आहे म्हणून डॉ. तारा भवाळकर यांनी लोकसाहित्य, संत कवयित्रींच्या व्यक्तिमत्वाबरोबरच 'स्त्री मुक्तीचा आत्मस्वर' या पुस्तकातुन स्त्रीप्रतिमांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला.

स्वातोंत्र्योत्तर कालखंडात साहित्यक्षेत्रात स्त्रियांनी मोठ्या प्रमाणात कथा, कादंबरी कविता, नाटक या वाङमय प्रकारात विपुल प्रमाणात लिखान केले. कुसमावती देशपांडे, डॉ. सिरोजिनी वैद्य, डॉ.त विजया राजाध्यक्ष आशा बेग, डॉ. तारा भवाळकर, उषा हस्तक, डॉ. अरूणा ढेरे, डॉ. अंजली सोमण, डॉ. वीणा देव, डॉ. अंजली कीर्तने, डॉ. निलिमा गुंडी, या लेखिकांनी स्त्रियांच्या दु:खाला आपल्या साहित्यातुन वाचा फोडली १९८० ते १९९० या काळात गौरी देशपांडे, सानिया, आशा बेग, प्रिया तेंडूलकर या कथा लेखिकांनी दर्जेदार कथालेखन केले.

**कथालेखिकांच्या कथेतील स्त्री जाणिवा :-**

प्रतिमा इंगोले यांनी 'अमंगल युग' या कथासंग्रहात राजकारण आणि शिक्षण व्यवस्थेतील अपप्रवृत्तीवर बोट ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. अरुणा ढेरे, विजया राजाध्यक्ष आणि सानिया या आत्ममग्न लेखिका आहेत आशा बेग यांची कलात्मक कथा शांत, संघ, लयीत उलंगडत जातांना दिसतात. शहरी जीवनापासून दुर असलेले अनुभव त्या टिपतांना दिसतात. अरुणा ढेरे यांनी 'कृष्णा किनारा' या कथासंग्रहातून स्त्री-पुरुष नात्यांमधील नाजुक पदर उलगडण्याचा प्रयत्न केला आहे तर 'मन केले 'वाहीं' या कथासंग्रहातून वाङमयाच्या जगात वावरणाज्या माणसांचे परस्परसंबंध, सृजनशील मनाला जाणवत जाणारे पेच या कथासंग्रहातून माडण्याचा प्रयत्न केला.

प्रतिमा इंगाले यांनी ग्रामीण जीवनातील दु:ख, दारिद्रय आणि तिथली पुरुषप्रधान व्यवस्था यांचे अतिशय प्रत्ययकारी दर्शन 'हजारी बेलपान', 'अकसदिचे दाने' 'सुगरनचा खोपा' 'लेक भुईचा' या कथासंग्रहातून घडते 'परायाची लेक' या कथासंग्रहात एकत्र कुटुंबात नि गरिबघरच्या मुलीचा कसा छळ केल्या जातो. याचे चित्रण 'केशर' या पात्राच्या रूपाने रंगवतात. लग्नानंतर "बायकोची जिनगानी नवज्याची व्हते पर नवज्याच्या जिनगानीवर बायकोची काडीची सत्ता नसते" हे स्त्रियांच्या वास्तव जीवनाचे चित्रण रंगवताना दिसतात. 'थोड' या कथेत ग्रामीण स्त्रीच्या दु:खाचे दारिद्रय हेचकारण आहे हे सांगतात.

विजया राजाध्यक्ष यांच्या लेखणाची सुरवात आत्ममग्न पध्दतीने झाली असली तरी नंतर त्यांनी सामाजिक प्रश्नांकडे अधिक सजगतेने पाहिले. 'उतरार्ध' 'आधी नंतर' 'समांतर' या कथासंग्रहातून 'स्त्रीवादी भान' असलेली स्त्री दिसू लागली. प्रिया तेंडूलकर, मेघना पेठे, अनुराधा चिन्मुळगुंद या लेखिका समाजमनस्क पध्दतीने कथेतील अनुभव मांडतांना दिसतात. 'नकटीच्या लग्नाला' (ज्याचा त्याचा प्रश्न) या कथेत हवाईसुंदरीच्या द्विधा मनःस्थितीचे चित्रण रंगवतात, 'नवी गडी' या कथेतील मनिषा स्वतःच्या पायावर उभी असल्यामुळे ती ताठ मानेने जगते. असिफशी आपले पटत नाही, हे लक्षात आल्यानंतर ती घटस्फोट घेते. पुढे सुरेश तिच्या मुलांसह स्वीकारायला तयार असतो पण त्याचा अधिकार गाजवण्याचा स्वभाव लक्षात येतो त्यामुळे त्याच्यासोबत लग्नाचा 'नवा डाव' मांडायला नकार दर्शवते मेघना पेठे यानी 'हंस अकेला' अंधळयाच्या गायी या कथासंग्रहातून स्त्री जीवनातील विविध प्रश्नांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. स्त्रियांचे चित्रण स्त्रीवादी जाणिवातून केले आहे स्त्रीमुक्तीच्या विचाराने मानवमुक्तीचा विचार मांडला पाहिजे असे त्यांना वाटते. अनुराधा चिन्मुळगुंद प्रथमापुरूषी स्त्रीवचनी' या कथासंग्रहातून स्त्रीवादी जाणिवेतून

सामाजिक अनुभव मांडतांना दिसतात. नीलम माणगावे 'साक्षीदार' 'शांते तू जिंकलीस' 'तीच माती तेच आकाश' या कथासंग्रहातून धाडसी विषयाला हात घालण्याचा प्रयत्न केला आहे या सर्व कथालेखिका जीवनाकडे गंभीरपणाने पहातांना दिसतात. मानवी प्रवृत्तीचे सुक्ष्म निरीक्षण केल्याचे दिसते.

**निष्कर्ष :-**

मराठी साहित्यात मध्ययुगीन काळापासूनच स्त्री साहित्य लेखनाला सुरवात झालेली दिसते. महदंबा, मुक्ताबाई, जनाबाई, बहिणाबाई यांनी आपल्या भावना कवितेतून व्यक्त केल्या. १९२० नंतर स्त्री-शिक्षणाच्या प्रसारामुळे व सामाजिक वातावरणातील बदलामुळे स्त्रिया प्रगल्भ होत गेल्या त्यातूनच स्त्रीयांच्या वाङमयाकडे नव्या - दृष्टीकोनातून पाहिले जावू लागले. १९ व्या शतकातील स्त्री कथालेखिकांनी बंडखोर स्त्रीची प्रतिमा रेखाटली नाही. २० व्या शतकात मात्र स्त्री-शिक्षणाच्या प्रसारामुळे व सामाजिक वातावरणात झालेल्या काही बदलामुळे कथालेखनातून सामाजिक जाणिवा व्यक्त होवू लागल्या. समाजात जसा जसा बदल होत जावू लागला तसातसा साहित्याचे विषय, आशय पात्रचित्रण, भाषाशैली बदलू लागली त्यामुळे स्त्री जीवनांची विविधांगी रूप साहित्यातून स्त्री लेखिका रंगवू लागल्या.

**संदर्भ ग्रंथ**

१) साने गीताः भारतीय स्त्री जीवन
२) सावंत मंगल-स्त्री पर्व
३) हाटे चंद्रकला-स्वातंत्र्योत्तर भारतीय स्त्री
४) स्त्री विकासाचे नवे क्षितिज - डॉ. स्वाती कर्वे